THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

MONDAY 29TH SEPTEMBER 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

---

"मुंबईचा म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबद आक्टाचा मसुदा" यावर मुंबईचे आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या कौन्सिलाच्या सिलेक्ट कमिटीनें केलेला खालील रिपोर्ट व सिलेक्ट कामिटीनें सुधारला आहे त्याप्रमाणें तो मसुदा हे, कौन्सिलाच्या सभांचें काम चालविण्याबाबदच्या कानूंपैकीं २९ व्या कानून अनुसरून, सर्व लोकांस जाहिर होण्यासाठीं प्रसिद्ध केले आहेत:—

मुंबईचा म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबद आक्टाचा मसुदा (सन १८९० चा नंबर १) याचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट.

आम्ही, सन १८९०चा आक्टाचा मसुदा नंबर १ (मुंबईचा म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबद आक्टाचा मसुदा) याचा विचार करण्यासाठीं नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचे मेंबर, खालीं लिहिल्याप्रमाणें रिपोर्ट सादर करितों :—

१. आमची कमिटी भरली तितक्या वेळांत कमिटींतील दोघां मेंबरांनीं ह्मणजे, आनरेबल मि. लादाम आणि आनरेबल मि. बोफर्ट यांनीं राजिनामा दिल्यावरून, त्यांच्या योगानें कमिटीस जो फायदा व्हावयाचा तो झाला नाहीं.

२. सदर्हू मसुदा तारीख ८ माहे मार्च सन १८९० रोजीं इंग्रेजींत, आणि तारीख १८ माहे मार्च सन १८९० रोजीं मराठींत व गुजराथींत प्रसिद्ध करण्यांत आला.

३. सदर्हू मसुद्याचा विचार करण्याकरितां कमिटी दोन वेळां भरली. यांपैकीं पहिल्यानें तारीख २४ माहे मार्च सन १८९० रोजीं भरली त्यावेळीं, कमिटींत ज्या कित्येक सुधारणा योजण्यांत आल्या त्यांसहित सदर्हू मसुदा मुंबईच्या म्युनिसिपल कार्पोरेशनाच्या मतासाठीं त्यांजकडे पाठविण्याचें ठरलें. त्यांचें मत, अध्यक्षाच्या तारीख ३१ माहे जुलै सन १८९०च्या पत्रांतून लिहून कळविण्यांत आलें तें, आमची सभा दुसऱ्यानदा तारीख ९ माहे आगस्ट रोजीं भरली त्यावेळीं आमचेपुढें ठेविण्यांत आलें असून त्याचा आम्ही विचार केला आहे.

४. आम्ही कलम १, पोट-कलम (३), व कलम ९, पोट-कलम (१), यांतून, "मुंबई सरकारी गॅझेटांत" या शब्दांची, मुंबईचा सामान्य कलमांचा आक्ट (सन १८८६चा ३ रा) याच्या ९व्या कलमांतील "जाहिरनामा" या शब्दाच्या अर्थाप्रमाणें म्हटलें म्हणजे गरज नाहीं असें समजून, ते शब्द गाळलें आहेत.

५. आह्मीं कलम २, पोट-कलम (२) हें, " याचा भाग आहे असें समजावें " व " यांचा भाग आहे असें समजावें " या शब्दांबदल अनुक्रमें " याशीं मिळून वाचावा " व " यांशीं मिळून वाचावा " हे शब्द घालून, सुधारलें आहे.

६. मुंबईच्या कार्पोरेशनानें त्याप्रमाणें आपलें मत दर्शविल्यावरून आह्मीं कलम ३, रकम (अ) यांत, म्युनिसिपालिटीच्या नोकरीचा राजीनामा देण्याची परवानगी कमिशनरानें त्या कारणासाठीं नेमलेल्या इसमाच्यानें देतां यईल या अर्थाचे शब्द घातले आहेत. त्याच रकमेंत आह्मी, म्युनिसिपालिटीच्या नोकरींतील इसमास ज्या सबबींवरून परवानगीशिवाय आपल्या कामावरून गैरहजर राहण्यास हरकत नाहीं त्या सबबींची संख्या जेणेंकरून वाढेल असे शब्द जास्त घातले आहेत. या कलमांतील ज्या इतर फेरफारांचें आम्हीं खालीं विवेचन केलें आहे ते फेरफार करावे व त्यांबरोबर आणखी, नोकर लोकांचे संप किंवा गैर कायदेशीर कट यांसंबंधी एक रकम आम्ही दाखल करावी अशी आम्हांतून एका मेंबरानें इच्छा दर्शविली. परंतु " संप करणें " या शब्दांची व्याख्या करण्यास किंवा अन्यायाच्या कटाविषयीं एकादा कायदा आमच्या कायद्यांमध्यें दाखल करण्यास बरीच अडचण येईल असें आम्हांस वाटल्यावरून आम्हांस सदर्हू मेंबराच्या इच्छेप्रमाणें करतां आलें नाहीं; तथापि आम्ही सदर्हू कलमांत एक नवीन रकम (क) ज्यास्त घातली आहे, व तींत, रकमा (अ) व (ब) यांखालीं येणाऱ्या अपराधांस साह्य करण्याबदल विद्यमान कायद्यास अनुसरून शिक्षा ठरविली असल्यामुळें, त्या रकमेवरून सदर्हू गरज कांहीं अंशीं भागते. कोणत्याहि प्रकारें फार सख्ती होऊं नये ह्मणून आम्ही सदर्हू कलमांतील ठरावांत " त्यावेळीं येणें असलेल्या पगाराच्या सगळ्या बाकीवर " या शब्दांच्या ऐवजीं, जेणेंकरून फक्त नोकरीच्या चालू मुदतीबदल येणें असलेला पगार व पराकाष्ठा एक महिनापर्यंतच्या मुदतीबदल येणें असलेली पगाराची बाकी दंडादाखल घेण्याचा अधिकार प्राप्त होईल असे शब्द दाखल केले आहेत.

७. आह्मीं कलम ४, पोट-कलम (१), यांत, "कलम ३ (अ) यांत सांगितलेली राजीनामा देण्याची परवानगी देण्यास योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्यास" या शब्दांच्या बदला, जेणेंकरून कायद्याचा उद्देश अधिक स्पष्ट होतो असे, ह्मणजे, " कमिशनरास किंवा कलम ३ (अ) याअन्वयें म्युनिसिपालिटीनें अधिकार दिलेल्या अमलदारास " हे शब्द दाखल करून तें कलम सुधारलें आहे.

८. कलम ९ यावरून वस्तुतः गव्हर्नर इन् कौन्सिल यांस जाहिरनामा प्रसिद्ध करून कायदा करण्याचा अधिकार येतो असें आह्मांतून एका मेंबराचें मत असल्यावरून तें कलम गाळणें इष्ट नाहीं किंवा कसें याविषयीं आह्मीं विचार केला. परंतु ज्या अपवादांच्या प्रसंगांच्या संबंधानें सदर्हू मसुद्यांत तो ठराव केला आहे त्या प्रसंगांच्या संबंधानें पाहिलें असतां तो ठराव असणें रास्त आहे, आणि तो ठराव कायम ठेवावा असें कार्पोरेशनानें मत दर्शविल्यावरून तें कलम कायम राखण्याचें आह्मीं ठरविलें आहे. कार्पोरेशनाचा हेतु चांगल्या रीतीनें सिद्धीस नेण्याकरितां आह्मीं, कार्पोरेशनानें विनंति केली असतांच मात्र सदर्हू अधिकार चालवावयाचा अशा अर्थाचे शब्द घातले आहेत. पोट-कलम (२) यांत जाहिरनाम्यांत फेरफार करण्याचा किंवा तो रद्द करण्याचा अधिकार दिला आहे त्या अधिकारांत आणखी, जाहिरनामा माघारां घेण्याचा अधिकार दाखल करून तें पोट-कलम ज्यास्त पुरें केलें आहे.

९. म्युनिसिपालिटीच्या नोकरींतील ज्या इसमास हा आक्ट लागू असेल त्या प्रत्येकानें पहिल्यानें नोकरी पतकरली ह्मणजे त्यास हा आक्ट वगैरेची एक प्रत मोफत मिळण्याचा हक्क देतां येई अशा प्रकारें आह्मी ६ वें कलम सुधारलें आहे.

१०. आह्मांपैकीं एक मेंबर ह्मणजे, आनरेबल मि. जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक यांची, कलम ३, रकम (अ), यावरून देणें अवश्य असलेल्या नोटिसीची मुदत दोन महिने ठरविली आहे ती कमी करून एक महिना ठरवावी अशी इच्छा होती, व त्यांनीं ज्या कित्येक दुसऱ्या सुधारणा सुचविल्या होत्या त्यांच्या योगानें सदर्हू कलमाच्या पहिल्या भागाच्या ठिकाणीं अगदी नवीनच भाग झाला असता, ह्मणजे, त्या भागांत अपराधांचे निरनिराळे तीन वर्ग करावे लागले असते आणि त्या प्रत्येक वर्गाच्या अपराधांबदल निरनिराळी शिक्षा ठरवावी लागली असती. सदर्हू आनरेबल मेंबराच्या विनंतीवरून, सदर्हू कलम, त्यांतील पहिल्या विशेष ठरावापर्यंत, जसें असावें अशी त्यांची इच्छा आहे त्याप्रमाणें तें आह्मी खालीं दाखल करितों :

"३. परिशिष्टांत नमूद केलेल्या कामांपैकीं कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें कामावर ठेवलेला जो कोणताहि म्युनिसिपल अमलदार, नोकर अगर इतर मनुष्य :

(अ) मुंबई शहरांत कमिशनराच्या अगर या बाबतींत त्यानें नेमिलेल्या मनुष्याच्या लेखी परवानगीशिवाय, आणि इतर जागीं म्युनिसिपालिटीनें अशी परवानगी देण्यास अधिकार दिलेल्या अमलदाराच्या लेखी परवानगीशिवाय, त्या कमिशनरास अगर त्या अमलदारास निदान एक महिन्याची लेखी नोटीस न देतां, आपल्या हुद्याचा राजीनामा देईल, किंवा, अजारामुळें अगर अपघातामुळें आपल्या हुद्याचीं कामें बजावण्यास असमर्थ होईल ते प्रसंग खेरीज करून, अगर कोणतेंहि कारण तें वाजवी आहे असें समजून अशा कमिशनरानें किंवा त्यानें नेमिलेल्या मनुष्यानें, अथवा अशा अमलदारानें, मान्य केलें असेल तो प्रसंग खेरीजकरून, इतर प्रसंगीं सदहू कामें सोडून जाईल किंवा त्यांपासून गैरहजर राहील त्याचा, नोकरीच्या चालू मुदतीबद्दल येणें असलेल्या त्याच्या पगारावर आणि पराकाष्ठा एक महिनापर्यंतच्या मुदतीबद्दल येणें असलेल्या पगाराच्या बाकीवर हक्क नाहींसा होईल;

(ब) कार्पोरेशनानें किंवा म्युनिसिपालिटीनें अगर त्याच्या किंवा तिच्या वतीनें कामावर ठेवलेल्या अशा म्युनिसिपल अमलदाराच्या, नोकराच्या किंवा इतर मनुष्याच्या नात्यानें, आपण पाळावयाचा अगर मानावयाचा असा कायद्याचा कोणताहि ठराव, किंवा कोणतीहि कानू अथवा हुकुम जाणूनबुजून मोडण्याचा अगर जाणूनबुजून त्याकडे दुर्लक्ष करण्याचा गुन्हा करील त्याचा वर सांगितल्याप्रमाणें पगारावर हक्क नाहींसा होऊन त्याशिवाय आणखी त्यास पराकाष्ठा २० रुपयांपर्यंत दंड केला जाण्यास तो पात्र होईल, आणि तो फायर ब्रिगेडांतील असामी असल्यास त्यास सदहू शिक्षेखेरीज आणखी पराकाष्ठा तीन महिनेपर्यंत कैदेची शिक्षा केली जाण्यास तो पात्र होईल.

(क) सदहू कार्पोरेशनाच्या, किंवा म्युनिसिपालिटीच्या, नोकरींतील कोणत्याहि दुसऱ्या अमलदारास, नोकरास किंवा मनुष्यास संप करण्याविषयीं चिथवील, किंवा कामाबद्दल संप करण्यासाठीं एकत्र जमलेल्या मंडळींतील असामी असेल, किंवा असा संप करण्यास साह्य करील, त्यावर म्याजिस्ट्रेटापुढें अपराधाची शाबिती झाली असतां त्याचा सदहूप्रकारें पगारावरील हक्क नाहींसा होऊन व त्यास सदहूप्रकारें दंड होऊन त्याशिवाय आणखी त्यास पराकाष्ठा तीन महिनेपर्यंत कैदेची शिक्षा दिली जाण्यास किंवा दंडाची शिक्षा दिली जाण्यास किंवा दोन्ही शिक्षा दिल्या जाण्यास तो पात्र होईल."

ह्या सुधारणा अशेष रीतीनें आमच्यानें कबूल करवत नाहींत, कारण रकमा (अ) व (ब) यांतील अपराधांबद्दल ठरविलेल्या शिक्षा अपुऱ्या आहेत असें आम्हास वाटतें, व तसेंच रकम (क) यांतील ठरावाची गरज नाहीं असेंहि आम्हांस वाटतें व याबद्दलचीं कारणें आम्हीं सदरीं लिहिलींच आहेत. परंतु रकम (अ) हिच्या संबंधानें सुचविलेली सुधारणा आम्ही कांहीं अंशीं घेतली आहे, आणि सदहू आनरेब्ल मेंबराच्या (क) रकमेबद्दल जी रकम आम्ही दाखल केली आहे ती, सदहू मेंबर ज्या भीतीच्या संबंधानें सावधगिरी ठेवूं इच्छितात त्या भीतीचें निवारण होण्यास पुरे आहे असें आम्हांस वाटतें.

(सही) आर. वेस्ट.
" रे. म. सयानी.
" नवरोजी. न. वाडिया.
" लल्लेराल. उ. याज्ञिक.

मुक्काम मुंबई, तारीख ३० आगस्ट, सन १८९०.

## मुंबईच्या म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबत आक्टाचा मसुदा.

## सन १८९० चा मसुदा नंबर १.

मुंबई शहरांत व इतर जागीं, म्युनिसिपालिटीच्या ज्या विवक्षित वर्गांच्या नोकरांच्या कामांचा सार्वजनिक आरोग्याशीं अगर सुरक्षितपणाशीं संबंध असतो, त्यांच्या संबंधाचे, आणि अशा नोकरांचीं कर्तव्यें, त्यांनीं काम सोडून जाणें, व त्यांनीं रजेवर जाणें यासंबंधाचे नियम अमलांत आणण्याबद्दल जास्त तजवीज करणें ज्याअर्थी योग्य आहे, त्याअर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा.

१. (१) ह्या आक्टास मुंबईच्या म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबत आक्ट असें ह्मणावें.

सुरवात व व्याप्ति.

(२) तो मुंबई शहरांत लागलाच अमलांत येईल.

(३) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, जाहिरनामा प्रसिद्ध करून, ह्या आक्टाचे सर्व अगर कोणतेहि ठराव, अशा जाहिरनाम्याच्या तारिखेनंतर निदान दोन महिन्यांनीं अगर दोन महिन्यांनंतर, मुंबई इलाख्यांतील कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास लागू करण्याचा अख्त्यार आहे.

तसेंच, ह्या आक्टाच्या ठरावांस अनुसरून, असा कोणताहि जाहिरनामा रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा त्यांस अख्त्यार आहे.

अर्थ.

२. (१) विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर, ह्या आक्टांत योजिलेल्या सर्व शब्दांचे, सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट यांत जे अर्थ दिले आहेत, ते प्रत्येकीं अर्थ होत.

हा आक्ट, अमलांत असलेल्या म्युनिसिपल आक्टांशीं मिळून वाचावा.

(२) ह्या आक्टाचा ज्या बाबतींत मुंबई शहराशीं संबंध आहे त्या बाबतींपुरता तो, सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट याशीं मिळून वाचावा, आणि ज्या बाबतींत मुंबई इलाख्याच्या इतर कोणत्याहि भागाशीं त्याचा संबंध आहे त्या बाबतींपुरता तो, सन १८७३ व १८८४ चे मुंबईचे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट यांशीं मिळून वाचावा.

निर्दिष्ट केलेल्या कामांचा राजीनामा देण्याच्या, तीं सोडून जाण्याच्या आणि त्यांत गैरहजर होण्याच्या संबंधानें अटी.

३. परिशिष्टांत नमूद केलेल्या कामांपैकीं कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें कामावर ठेविलेला जो कोणताहि म्युनीसिपल अमलदार, नोकर अगर इतर मनुष्य:

(अ) मुंबई शहरांत कमिशनराच्या अगर या बाबतींत त्यानें नेमिलेल्या मनुष्याच्या लेखी परवानगीशिवाय, आणि इतर जागीं म्युनिसिपालिटीनें अशी परवानगी देण्यास अधिकार दिलेल्या अमलदाराच्या लेखी परवानगीशिवाय, त्या कमिशनरास अगर त्या अमलदारास निदान दोन महिन्यांची लेखी नोटीस न देतां, आपल्या हुद्याचा राजीनामा देईल, अगर, आजारामुळें किंवा अपघातामुळें त्या हुद्याचीं कामें बजावण्यास असमर्थ होईल असे प्रसंग खेरीज करून किंवा इतर कोणतेंहि कारण तें वाजवी आहे असें समजून अशा कमिशनरानें किंवा त्यानें नेमलेल्या मनुष्यानें, किंवा अशा अमलदारानें मान्य केलें असेल तो प्रसंग खेरीज करून, इतर प्रसंगीं तीं कामें सोडून जाईल किंवा त्यांपासून गैरहजर राहील; अगर

कर्तव्याची हयगई किंवा त्याचें उल्लंघन.

(ब) कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें कामावर ठेविलेल्या अशा म्युनिसिपल अमलदाराच्या, नोकराच्या अगर इतर मनुष्याच्या नात्यानें, आपण

पाळावयाचा अगर मानावयाचा असा कायद्याचा कोणताहि ठराव, किंवा कोणतीहि कानू अगर हुकुम जाणूनबुजून मोडण्याचा अगर त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष्य करण्याचा गुन्हा करील; अगर

(क) रकम (अ) किंवा रकम (ब) यांखालीं येणारा अपराध करण्यास साह्य करील;

त्याचा नोकरीच्या चालू मुदतीबदल येणें असलेल्या त्याच्या पगारावर व पराकाष्ठा एक महिनापर्यंतच्या मुदतीबदल येणें असलेल्या पगाराच्या बाकीवर हक्क नाहींसा होईल; आणि हा त्याचा हक्क नाहींसा होऊन त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याअन्वयें अगर कानूअन्वयें त्यास जी कोणतीहि इतर शिक्षा होईल तिच्या शिवाय त्यास, त्यावर माजिस्ट्रेटानें अपराधाची शाबिती केली असतां, पराकाष्ठा तीन महिनेपर्यंत कैदेची शिक्षाहि दिली जाण्यास, अगर दंडाची शिक्षा दिली जाण्यास, अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या जाण्यास तो पात्र आहे असें समजावें :

परंतु असें ठरविलें आहे कीं, असा कोणताहि अमलदार, नोकर अगर इतर मनुष्य, आपलीं कामें करण्यास त्या वेळीं नालायक असल्याबदलचा, आणि ती नालायकी एक महिनाभर अगर अधिक मुदतीपर्यंत चालण्याचा संभव आहे अशाबदलचा, या बाबतींत मुंबई शहरांत कमिशनरानें आणि इतर जागीं म्युनिसिपालिटीनें नेमिलेल्या वैद्यकीय अमलदाराच्या सहीचा दाखला सादर करील, तर, राजीनामा देण्यास लागणारी परवानगी त्यास तात्काळ दिली पाहिजे. विशेष ठराव.

शिवाय आणखी असें ठरविलें आहे कीं, पूर्वोक्त दाखल्याबदल अगर त्यासंबंधाच्या परीक्षेबद्दल कोणत्याहि मनुष्याकडून फी मुळींच घेऊं नये.

राजीनामा रुजू केल्यानंतर दोन महिन्यांची नोटीस न मागण्याचा अगर नोकरींतून मोकळें करण्याचा अधिकार.

४. (१) कलम ३ (अ) याअन्वयें कमिशनरास किंवा म्युनिसिपालिटीनें अधिकार दिलेल्या अमलदारास :

(अ) योग्य वाटल्यास राजीनाम्याच्या तारिखेपासून दोन महिन्यांच्या आंत तो राजीनामा मंजूर करून अमलांत आणण्याचा अख्त्यार आहे; अगर

(ब) सदरीं सांगितल्याप्रमाणें कामावर ठेविलेल्या कोणत्याहि म्युनिसिपल अमलदारानें, नोकरानें अगर इतर मनुष्यानें आपला राजीनामा रुजू केल्यानंतर कोणत्याहि वेळीं त्या अमलदारास, नोकरास अगर मनुष्यास नोकरींतून मोकळा करण्याचा अख्त्यार आहे.

(२) पोट-कलम १, रकम (ब) अन्वयें नोकरींतून मोकळा केलेल्या सदहू कोणत्याहि अमलदारास, नोकरास अगर इतर मनुष्यास, तो व कार्पोरेशन अगर कार्पोरेशनचा मुख्त्यार किंवा म्युनिसिपालिटी अगर तिचा मुख्त्यार यांच्या दरमियान झालेल्या कोणत्याहि पूर्वीच्या लेखी करारास अनुसरून, राजीनामा रुजू केल्याचे तारिखेपर्यंत लागू झालेल्या पगाराशिवाय, आणखी पंधरा दिवसांचा, अगर राजीनामा रुजू केल्यानंतर यासंबंधानें अधिकार असलेला अमलदार १५ दिवसांपेक्षां जितक्या जास्त मुदतीपर्यंत त्यास कामावर ठेवील तितक्या मुदतीचा, पगार मिळण्याचा हक्क आहे.

परिशिष्टांत अधिक मजकूर घालण्याचा गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा अधिकार.

५. (१) गव्हर्नर इन कौन्सिल यांस, कार्पोरेशनानें किंवा म्युनिसिपालिटीनें विनंती केली असतां, वेळोवेळीं जाहिरनामा प्रसिद्ध करून, सार्वजनिक आरोग्याशीं अगर सुरक्षितपणाशीं कामांच्या ज्या कोणत्याहि विवक्षित वर्गाचा संबंध आहे तो वर्ग, त्या जाहिरनाम्यांत ठरविलेली व त्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आंतली नाहीं अशा तारिखेपासून, ह्या आक्टाच्या परिशिष्टांत सामील केला आहे असें समजावें असें प्रसिद्ध करण्याचा कायदेशीर अधिकार आहे; आणि त्या

जाहिरनाम्यांत याप्रमाणें नमूद केलेल्या प्रकारचें कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें ठेविलेल्या सर्व मनुष्यांस कलम ३ याचे ठराव, त्या जाहिरनाम्यांत या संबंधानें ठरविलेल्या तारिखेपासून लागू करण्यांत येतील.

(२) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस असा जाहिरनामा माघारा घेण्याचा अधिकार आहे व त्यांस, गेल्या शेवटल्या रकमेस आणि ह्या आक्टांतील इतर ठरावांस अनुसरून असा जाहिरनामा वेळोवेळीं रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा आणि तसेंच कोणताहि जाहिरनामा, हा आक्ट ज्या कोणत्याहि म्युनिसिपालिटीस अगर जागेस लागू असेल त्या म्युनिसिपालिटीसच अगर जागेसच लागू करण्याचा अखत्यार आहे.

नौकरांस आक्टाच्या प्रती थोड्या किंमतीनें देणें.

६. परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या कामांपैकीं कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें ठेविलेल्या प्रत्येक मनुष्यास, मुंबई शहरांत मुंबई शहराच्या म्युनिसिपल कमिशनराकडून आणि इतर ठिकाणीं म्युनिसिपालिटीच्या प्रेसिडेंटाकडून, या आक्टाचा आणि या आक्टाअन्वयें दिलेले जे जाहिरनामे त्या मनुष्यास अगर तो ज्या वर्गापैकीं असेल त्यास लागू असतील त्यांची इंग्रेजी, मराठी, गुजराती, कानडी अगर सिंधी भाषेंतील एक प्रत, तो नोकरीवर पहिल्यानें रुजू झाला ह्मणजे मोफत व त्यानंतर कोणत्याहि वेळीं एक आणा दिला असतां, मिळण्याचा हक्क आहे असें समजावें.

---

## परिशिष्ट.

### (कलम ३ पाहा.)

**जीं कामें करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें ठेविलेल्या मनुष्यांस कलम ३ याचे ठराव लागू होतात तीं कामें.**

**वर्ग १.**—सार्वजनिक आरोग्याच्या संबंधाचीं कामें:

(अ) रस्ते अगर घरांच्या आसपासच्या जागा यांवरील मैल काढून नेणें अगर ते साफ करणें,

(ब) मोऱ्या साफ करणें अगर धुणें,

(क) घरांतून, पायखान्यांतून, शेतखान्यांतून, मुत्र्यांतून अगर डबक्यांतून नरक अगर घाणीचा पदार्थ काढून नेणें, अगर सदर्हू काढून नेलेल्या पदार्थांची व्यवस्था लावणें,

(ड) जनावरांचीं प्रेतें नेणें,

(इ) साधारणतः, घाण न होऊं देणें.

**वर्ग २.**—सार्वजनिक सुरक्षितपणाच्या संबंधाचीं कामें:

(अ) फायर ब्रिग्रेडींतल्या इसमांचीं कामें.

(ब) कोणतेंहि म्युनिसिपल पाण्याचें काम, पाट, पंपिंग स्टेशन, अगर फायर हैड्रन्ट यांच्या मरामतीवर अगर त्यांचें काम चालविण्याकरितां किंवा त्यांच्या मरामतींच्या अगर काम चालविण्याच्या संबंधानें ठेविलेल्या लोकांचीं कामें, त्यांचे हुद्दे मग कोणतेंहि असले तरी चिंता नाहीं; यांतः

(१) इन्स्पेक्टर,

(२) सब्-इन्स्पेक्टर,

(३) फोरमेन,

(४) कारागीर,

(५) ड्रायव्हर,

(६) पाहोरेकरी,

(७) मजूर,

(८) कामकरी,

यांचा समावेश होतो.

(क) दिवे लावणारांचीं कामें.

अलीजा बहादुर गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) ए. सी. लोगन,

मुंबईचे आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर यांच्या
कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

मुक्काम मुंबई,
तारीख ४ माहे सप्टेंबर सन १८९०.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.